# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५ / फाल्गुन २६, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **शालेय शिक्षण मंत्री** | |
| **(४)** | **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | |
| **(५)** | **पणन, राजशिष्टाचार मंत्री** | |
| **(६)** | **क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री** | |
| **(७)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(८)** | **वस्त्रोद्योग मंत्री** | |
| **(९)** | **सहकार मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

### पुणे शहर व जिल्ह्यात हानिकारक कॉस्मेटिक उत्पादनांचे बनावट कारखाने सुरू असल्याबाबत

**(१) * १०१३ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व जिल्ह्यात हानिकारक कॉस्मेटिक उत्पादनांचे बनावट कारखाने सुरु असून त्या उत्पादनाची नागरिकांना कमी किंमतीत विक्री करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारखान्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे काय, तसेच हानिकारक कॉस्मेटिक उत्पादनांच्या निर्मितीमध्ये वापरण्यात येणारे घातक रसायने आणि त्याच्या वितरणावर प्रतिबंध घालण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे,

(३) तसेच सदर उत्पादनांच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती तांत्रिक साधने किंवा ट्रॅकिंग यंत्रणा तयार करण्यात आली आहे,

(४) असल्यास, नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी आणि अशा उत्पादनांची ओळख करुन देण्यासाठी कोणते विशेष उपक्रम राबविले जात आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बनावट कारखान्यांच्या संबंधित मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे जिल्ह्यात हानिकारक कॉस्मेटिक उत्पादनांचे बोगस कारखाने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले नाही.

तथापि, माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये मे.घर सोप्स प्रा.लि. धायरी, पुणे या सौंदर्य प्रसाधन पेढीच्या उत्पाद -

परवान्याबाबत शंका आल्याने सौंदर्य प्रसाधनाचा साठा प्रतिबंधित केला. तसेच, माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये मे. ब्युटी कॉस्मेटिक्स, चिंचवड, पुणे येथून उत्पादकाचे संपूर्ण नाव, समुह क्रमांक, Import License No. इत्यादी तपशील नमूद नसलेला सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त करण्यात आला.

(२) अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणीवेळी उपलब्ध साठयाची पडताळणी करण्यात येऊन सखोल तपास करण्यात येतो आणि संशयित दर्जाबाबत कॉस्मेटिकचे नमुने चाचणी साठी घेण्यात येतात.

(३) अन्न व औषध प्रशासनाद्वारे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याखालील सौंदर्य प्रसाधने नियम, २०२० मधील तरतुदीनुसार सौंदर्य प्रसाधने उत्पादकांच्या नियमित तपासण्या करण्यात येतात. तसेच, उत्पादक व वितरकांकडून सौंदर्य प्रसाधनांचे नमुने विश्लेषणांकरीता घेण्यात येतात.

(४) अन्न व औषध प्रशासनद्वारे नागरिकांमध्ये परिसंवादच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येते.

(५) मे. घर सोप्स प्रा.लि. धायरी, पुणे या पेढीमधून रु.२०,७२,४८७/- एवढ्या किंमतीचा सौंदर्य प्रसाधानाचा साठा प्रतिबंधीत करण्यात आला असून सौंदर्य प्रसाधानांचे नमूने विश्लेषणांसाठी घेण्यात आले आहेत. सदर ठिकाणी आढळून आलेले सौंदर्य प्रसाधनांचे उत्पादक हे कर्नाटक व तेलंगणा येथील असल्यामुळे औषध नियंत्रक, कर्नाटक व तेलंगणा यांना कळविण्यात आले आहे. तसेच, मे. ब्युटी कॉस्मेटिक्स, चिंचवड, पुणे येथून उत्पादकाचे संपूर्ण नाव, समुह क्रमांक, Import License No. इत्यादी तपशील नमूद नसलेला सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त करून नमूने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील न्यू ऑरेंजसिटी अर्बन क्रेडीट को-ऑप.सोसायटी मर्या. संस्थेच्या अध्यक्षांनी ठेवीदारांच्या रकमेत केलेला गैरव्यवहार

**(२) * १५२५ श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यू ऑरेंजसिटी अर्बन क्रेडीट को-ऑप सोसायटी मर्या (जि.नागपूर) या संस्थेच्या अध्यक्षांनी ठेवीदारांच्या ठेवींच्या रकमेत गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेवींबाबत सहकार आयुक्तांची मान्यता न घेता कोटयवधींचा व्यवहार केल्याबाबत ठेवीदारांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या लेखापरिक्षणात सदर बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थेच्या अध्यक्षांनी निबंधकांची परवानगी न घेता स्वमालकीची कवडीमोल बाजारमूल्याची मालमत्ता संस्थेला कोटयवधी रुपयांमध्ये विकल्याचेही लेखापरिक्षण अहवालामध्ये नमूद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आर्थिक अनियमिततेस जबाबदार असलेल्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक २३ मार्च २०२३, २८ एप्रिल, २०२३ व ८ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्रान्वये लेखापरिक्षकांनी निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठेवीदारांच्या ठेवी परत देणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय हे खरे आहे.

न्यू ऑरेंजसिटी अर्बन क्रेडीट को-ऑप सोसायटी मर्या. (जि. नागपूर) या संस्थेच्या अध्यक्षांनी ठेवीदारांच्या ठेवींच्या रकमेत केलेल्या गैरव्यवहाराबाबत संस्थेच्या सन २०२१-२२ च्या लेखापरीक्षण अहवालात निदर्शनास आले आहे.

(२) व (३) यासंदर्भात ठेवीदारांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संस्थेचे सन २०२२-२३ चे लेखापरीक्षण करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, नागपूर यांचेकडून दिनांक १४.०६.२०२३ च्या आदेशान्वये विशेष लेखापरीक्षक, वर्ग-२ (पणन) नागपूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच संस्थेचे सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीचे चाचणी लेखापरीक्षण करण्याचे आदेशही जिल्हा उपनिबंधक, नागपूर यांचेकडून दिनांक २५.०६.२०२४ रोजी देण्यात आले आहेत. अद्यापी सदर लेखापरीक्षण अहवाल

प्राप्त झालेला नाही.

(४) संस्थेच्या सन २०२१-२२ च्या लेखापरिक्षण अहवालात आर्थिक अनियमितता नमूद असून या अनियमिततेस जबाबदार असलेल्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश संस्थेच्या संबंधित लेखापरिक्षकास उपनिबंधक कार्यालयाने दिनांक २३ मार्च, २०२३, दिनांक २८ एप्रिल, २०२३ व दिनांक ०८ जून, २०२३ रोजी दिले आहेत. जिल्हा उपनिबंधक, नागपूर यांचे सदर आदेश विभागीय सहनिबंधक, नागपूर यांनी दिनांक ०४.०७.२०२३ रोजी रद्द केले आहेत.

(५) ठेवीदारांच्या ठेवी परत मिळत नसल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने संस्थेच्या आर्थिक स्थितीस कोण जबाबदार आहे याबाबत चौकशी करण्याकरिता सहायक निबंधक, सहकारी संस्था, काटोल यांची दिनांक २१.०४.२०२३ च्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली असून कलम ८८ अंतर्गत चौकशी सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माजलगाव (जि.जालना) येथून नागपूर जिल्ह्यात जाणाऱ्या रेशनिंगच्या तांदूळामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३) * ४५५७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.जालना) येथून नागपूर जिल्ह्यात काळयाबाजारात जाणारा ३० टन रेशनचा सुमारे दहा लाख किंमतीचा तांदूळ परतूर पोलीसांनी वाटूर फाटा येथे नाकेबंदी करून ट्रकसह जप्त केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठया प्रमाणात रेशनिंगचा तांदूळ बाजारभावाने विकला जात असून रेशनधान्याचा मोठा गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) हे खरे नाही.

माजलगाव हा तालुका जालना जिल्ह्यामध्ये येत नसून बीड जिल्ह्यामध्ये आहे. नागपूर येथे जाणारा तांदूळ पोलीसांनी वाटुर फाटा, ता. परतूर, जि. जालना येथे ट्रकसह जप्त केला आहे. या प्रकरणी एफआयआर क्र. ४३/२०२५, दि. ०२/०२/२०२५ नुसार ४ व्यक्तींविरुध्द पोलीस ठाणे, परतूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदरहू जप्त माला संदर्भात ४ व्यक्तींविरुध्द जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे कलम ३ व ७ अंतर्गत पोलीस ठाणे, परतूर येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, जालना यांनी सदर प्रकरणी जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे कलम ६ (ब) प्रमाणे संबंधितास कारणे दाखवा नोटीस बजावली असून, जिल्हाधिकारी जालना यांचेकडे सुनावणी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळण्यासाठी बंद केलेले सीसीआय केंद्र सुरू करण्याबाबत**

**(४) * ४३३४ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय देरकर (वणी), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला दर मिळत नसतानाच शासनाकडून सुरु असलेली सीसीआयची

(Cotton Corporation of India) खरेदी बंद करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी बाजारात कापसाला जवळजवळ ६ हजार रुपयांचा दर मिळत असून सीसीआयची खरेदी थांबल्यानंतर खाजगी बाजारातील कापसाचे दर देखील कमी होत असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मंडळाकडून राज्यात फक्त १२७ केंद्रे सुरु असून "सीसीआय" च्या मुंबईतील पथकाकडून कापूस खरेदी केंद्रावर आकस्मिक भेटी दिल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सीसीआय केंद्र सुरु करणे, कापसाला योग्य दर देणे, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणेकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) अंशत: खरे आहे.

काही तांत्रिक कारणामुळे दि.०९.०२.२०२५ रोजी सीसीआयचे कापूस खरेदीचे काम विस्कळीत झाले होते. त्याचे निराकरण करुन खरेदी प्रक्रिया सुरळीत केली.
(२) सी.सी.आय. यांच्याकडून राज्यात किमान हमी दराने कापूस खरेदी सुरु असून दि.०५ मार्च, २०२५ अखेर सुमारे ५.८१ लक्ष शेतकऱ्यांकडून १३८.३८ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला आहे.
(३) व (४) कापूस खरेदी केंद्रावर भेटी देणे हा सीसीआयच्या नियमित कामकाजाचा भाग असल्याने त्यांच्या अधिकाऱ्यांकडून नियमित दौरे केले जातात.

भारतीय कपास निगम लिमिटेड (सी.सी.आय.) यांच्याकडून राज्यात १२४ केंद्रांवर किमान हमी दराने कापूस खरेदी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत

**(५) * १९७३ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक मंडळ तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांमार्फत मोठया प्रमाणात गैरव्यवहार सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील विभागाचे काही अधिकारी बाजार आवारात अनधिकृत बांधकामाला अधिकृत करण्यासाठी संबंधितांसोबत आर्थिक संगनमत करून लिफ्ट बसविण्यासाठी परवानगी पत्र देवून महापालिकेवर दबाव आणत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाजार समितीच्या आवारात हस्तांतरण न करता संपूर्ण गाळ्यांची तोडफोड करणारे आणि अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर शौचालय घोटाळा, FSI घोटाळा सारख्या धान्य मार्केट मधील W विंग मधील ८२ गाळ्याला अनधिकृतपणे तोडफोड करून एकत्रीकरणाची परवानगी देणारे संचालक मंडळ दोषी आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील १५ अपात्र संचालकांना तात्पुरती स्थगिती मिळाली असून त्यांना बरखास्त करण्याऐवजी त्यांचेसोबत बैठक घेऊन अनधिकृत बांधकाम करून अर्थपूर्ण व्यवहार करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कांदा बटाटा मार्केट मधील कोल्ड स्टोरेज व धान्य मार्केट कोल्ड स्टोरेजचा गैरव्यवहार तसेच धान्य मार्केट समोर ५ वर्षांपासून धुळखात पडलेले नादुरुस्त कोल्ड स्टोरेज, पणन विभागाच्या मंजुरीविना सुरु असून दुरुस्तीच्या इ. कामांमध्ये गैरप्रकार सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, कोल्ड स्टोरेजचे वाटप वारंवार एकालाच देण्यात येत असल्याने मुंबई एपीएमसीतील सर्व कोल्ड स्टोरेजच्या झालेल्या वाटपाची चौकशी करुन संचालक मंडळ तात्काळ बरखास्त करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी

शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करुन संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

विकास टप्पा-२, मार्केट-२ (धान्य) येथील अतिरिक्त शॉप कम गोडाऊन संकुलातील डब्ल्यू ब्लॉकमधील पहिल्या मजल्यावरील कार्यालय क्र.१ ते ८२ बाजार समितीने श्री.चंद्रकांत रामाणे यांना कार्यकारी उपसमिती सभेतील ठराव क्र.२ अन्वये दि.०१.०८.२००६ पासून ६० वर्षाच्या दीर्घ मुदतीच्या कराराने जागा वाटप करण्यात आलेली आहे. सदरील कार्यालये दि.०४.०२.२००८ च्या पत्रानुसार मे.सप्तगिरी ट्रेडर्स यांच्या नावे वर्ग झाली असून, त्यांनी सदर जागा दि.१३.०९.२०२४ च्या भाडे कराराने मे.रॉयल ड्रायफ्रुट प्रा.लि. यांना विक्री केली आहे.

तसेच सदर ठिकाणच्या क्र.१ ते ८२ या कार्यालयातील दुरुस्तीचे काम नवी मुंबई महानगरपालिकेच्या दि.१७.०४.२००८ च्या नगररचना विभागाच्या मंजूर नकाशाप्रमाणे सुरु असून सदर दुरुस्ती / बांधकामासाठी नवी मुंबई महानगरपालिका यांनी परवानगी दिली आहे.

त्याचप्रमाणे धान्य मार्केटमधील डब्ल्यू विंगमध्ये लिप्ट बसविण्याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने सदर प्रकरणी परवानगी दिल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीवर सन २०१९ मध्ये निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले. सदर संचालक मंडळापैकी काही सदस्य अपात्र ठरत असल्यामुळे त्यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने सदर संचालकांच्या अपात्रतेबाबतच्या निर्णयास तात्पुरती स्थगिती दिल्यामुळे सदर संचालकांनी बैठकीत सहभाग घेतलेला आहे.

(५) व (६) हे खरे नाही.

(अ) मुंबई बाजार समितीमधील कांदा बटाटा मार्केट लगतच्या भुखंड क्र.४४ (प्लॉट नं.१ ते ५) येथील शितगृह मा.उच्च न्यायालयाच्या परवानगीने ई-निविदा प्रक्रियेद्वारे उच्चत्तम निविदाधारक मे.प्रभुहिरा ग्रो कोल्ड स्टोअरेज एलएलपी यांना सन २०१९ मध्ये भाडे तत्वावर चालविण्यास देण्यात आले. सन २०१९ ते २०२४ या कालावधीत या मधून बाजार समितीस रु.९.३९ कोटी इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

(ब) बाजार समितीमधील धान्य मार्केट लगतच्या भुखंड क्र.२ येथील शितगृह भाडे तत्वावर चालविण्यास देण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून उच्चतम निविदाधारक मे.सत्यराज कोल्ड फ्रेश एलएलपी यांना ऑगस्ट, २०२४ मध्ये भाडे तत्वावर चालविण्यास देण्यात आले आहे.

मात्र, शितगृहाचे बांधकाम डिसेंबर, २०१८ मध्ये कंत्राटदाराने पूर्ण केले असले तरी भोगवटा प्रमाणपत्र व कृषीशी निगडीत वीज जोडणी न मिळाल्याने शितगृहाचे हस्तांतरण बाजार समितीने करुन घेतले नाही. सदर शितगृह भाडेतत्वावर देण्यासाठी मशीनरी व विद्युत संबंधित दुरुस्तीच्या रु.१.०५ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास पणन संचालक यांची कलम १२(१) नुसार परवानगी घेऊन कार्यवाही करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरात गॅस सिलेंडरचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(६) * २६०३ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील चऱ्होली गावात भरलेल्या सिलेंडर मधून रिकाम्या सिलेंडरमध्ये अवैधरित्या गॅस भरुन त्याची चढया भावाने विक्री केली जात असल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा पद्धतीने अवैधरित्या गॅस भरताना मोठया प्रमाणात अपघात देखील होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोजगारासाठी परराज्यातून आलेल्या कामगारांकडे गॅस सिलेंडर घेण्यासाठी कागदपत्र नसल्याने

बेकायदेशीरपणे छोटया आकाराचे खाजगी सिलेंडर वापरणे, शहरातील हॉटेल व्यावसायिक अनधिकृतपणे घरगुती गॅस सिलेंडरचा राजरोसपणे वापर करीत असणे, गॅस चोरी, सिलेंडरचा काळाबाजार अशा अनेक घटना घडल्याचेही नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन यावर आळा घालणेसह यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) हे खरे आहे.

परंतु सदर घटना हि चिखली गावठाण येथे घडली असून चऱ्होली गावात घडल्याचे निदर्शनास येत नाही.

(२) होय हे खरे आहे.

तथापि, या संदर्भामध्ये शासनाकडून तपासणी पथक नेमून अशा ठिकाणांवरती वेळोवेळी धाडी टाकून गुन्हे दाखल करण्यात येतात.

(३) अंशतः खरे आहे.

रोजगारासाठी परराज्यातून आलेल्या कामगारांना गॅस सिलेंडर घेण्यासाठी एल.पी.जी. ऑर्डर २००० (पुरवठा आणि वितरण) मधील पॅरेलल मार्केटींग सिस्टीम शेड्यूल ३ नुसार छोट्या आकाराचे गॅस सिलेंडर बाजारामध्ये गॅस एजन्सीद्वारे उपलब्ध करुन दिले जातात. तथापि, अनधिकृतपणे घरगुती गॅस सिलेंडर वापर करणे, गॅस चोरी व सिलेंडरचा काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध या कार्यालयाकडून तपासणी मोहिम आखून कारवाई केली जाते. याच अनुषंगाने एकूण ३ घटना चिखली येथे घडल्या असून सदर संदर्भात दोषीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून गुन्ह्यातील नमूद सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(४) सदर संदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या अनुषंगाने अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या कार्यालयाद्वारे सर्व परिमंडळ अधिकारी व गॅस एजंसीच्या बैठका घेऊन दिशानिर्देश देण्यात आले व दोषीविरुद्ध उचित कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. तसेच सदर बाबत वेळोवेळी शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतात.

(५) लागू नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(७) * ५६१ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या अत्यंत कमी असल्याने विद्यार्थी संख्येअभावी वर्ग बंद पडत असून तेथील शिक्षक अतिरिक्त ठरविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढावी तसेच अशा शाळांचा भौतिक व गुणवत्तापूर्वक दर्जा उंचविण्यासाठी शासनस्तरावर कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

(३) असल्यास, जिल्हा परिषद शाळांमध्ये अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य, संगणक प्रणाली, डिजिटल शिक्षण, प्रयोगशाळा, प्रशिक्षित शिक्षक, इमारत, स्वच्छतागृह, स्वच्छ पिण्याचे पाणी, खेळाचे मैदान, परिसराचे सौंदर्यीकरण, आवश्यक निधी इ. सुविधा उपलब्ध होणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या शाळांमधील पटसंख्येची घट थोपविणे हे राज्य शासनापुढे मोठे आव्हान असून तसे न केल्यास तेथील विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) सरकारी शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांचे वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करण्यात येते, त्याद्वारे शिक्षकांची कार्यक्षमता वाढवून सरकारी शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात.

विद्यार्थी गुणवत्ता वाढ करण्याच्या अनुषंगाने सरकारी शाळांमध्ये महत्वपूर्ण शैक्षणिक उपक्रम जसे, पुनर्रचित सेतू अभ्यास, शाळा पूर्व तयारी मेळावे, पायाभूत भाषिक साक्षरता व गणितीय विकसन कार्यक्रम (निपूण महाराष्ट्र अभियान), इयत्ता १ ली विद्यार्थी प्रवेश, शाळापूर्व तयारी कार्यक्रम अंमलबजावणी, नियमित मूल्यमापन योजना, आंनददायी अभ्यासक्रम, पूरक अध्ययन साहित्याचा वापर, शाळा सुशोभिकरण, शालेय परिसर स्वच्छता इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात. अशाप्रकारे विविध उपक्रमांचे आयोजन करून पटसंख्या वाढविण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाययोजना केल्या जातात व विद्यार्थी घट थांबविण्यासाठी प्रयत्न केले जातात.

(३), (४) व (५) जिल्हा परिषद शाळांमध्ये अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य, संगणक प्रणाली, डिजिटल शिक्षण, प्रयोगशाळा, प्रशिक्षित शिक्षक, इमारत, स्वच्छता गृह, स्वच्छ पिण्याचे पाणी, खेळाचे मैदान, परिसराचे सौंदर्यीकरण इ. बाबींसाठी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण (DPC), आदर्श शाळा योजना, समग्र शिक्षा अभियान, आयडियल सेंटर या योजनांद्वारे निधी उपलब्ध करून देण्यात येतो व जिल्हा परिषदांच्या शाळांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

-----------------

## आदिवासी विकास महामंडळांतर्गत असलेल्या आधारभूत हंगाम भात खरेदीसाठी मुदतवाढ देण्याबाबत

**(८) * २०८२ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळ अंतर्गत असलेल्या आधारभूत केंद्रांना हंगामातील भात खरेदीसाठी अद्याप मुदतवाढ देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षातील जवळपास ५६ हजार क्विंटल भात भरडाई अभावी प्रलंबित असल्याने या हंगामातील भात खरेदी प्रकिया लांबली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खरेदी प्रक्रियेअभावी भात साठवणूकीसाठी पुरेशी व्यवस्था उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) हे खरे नाही.

खरीप पणन हंगाम २०२४-२५ करिता दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत धान खरेदीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

जव्हार प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधील पणन हंगाम २०२३-२४ मधील सुमारे ५६ हजार क्विंटल धान भरडाईविना शिल्लक होता. तथापि, राज्य शासनाच्या मागणीनुसार दिनांक २४ जानेवारी, २०२५ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने भरडाईस १ महिन्याची मुदतवाढ दिली. सदर मुदतीत शिल्लक धानाची भरडाई झालेली आहे. या हंगामातील धान खरेदी प्रलंबित झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

जव्हार प्रादेशिक कार्यालयाने धान खरेदीकरिता आवश्यक गोदामे भाडेतत्वावर घेतली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे वखार महामंडळाच्या गोदामाचे भाडे वसुलीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(९) * ३५८ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथे बनावट पावत्या बँकेत तारण ठेवून, खोटी कागदपत्रे, खोट्या नोंदींच्या आधारे महामंडळाच्या गोदामाचे भाडे बुडवून शासनाची तब्बल १३ कोटी ४१ लाख ७१ हजार ८६६ रुपयांची फसवणूक केल्याचे माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात वखार महामंडळाचे सहायक साठा अधीक्षक तथा इचलकरंजी केंद्रप्रमुख यांच्यासह १९

जणांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोदामांचे भाडे वसुलीसह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) अंशत: खरे आहे.

माहे मार्च, २०२४ मध्ये इचलकरंजी, जि.कोल्हापूर येथील वखार केंद्राच्या वार्षिक तपासणी दरम्यान दप्तरनोंदीत त्रुटी आढळून आल्या होत्या.

(२) हे खरे आहे.

(३) वखार महामंडळाने केलेल्या लेखा परिक्षणात १८ ठेवीदारांनी केंद्र प्रमुखाच्या संगनमताने गोदामात माल न ठेवता बोगस वखार पावत्यांवर विविध बँकांकडून कर्ज घेतल्याचे दिसून आले.

सदर गैरव्यवहाराच्या अनुषंगाने इचलकरंजी वखार केंद्राचे केंद्रप्रमुख यांना दि.२७.०३.२०२४ रोजी निलंबित केले असून, त्यांची विभागीय चौकशी सुरु करुन त्यांचेवर दि.०२.०८.२०२४ रोजी दोषारोप बजावण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी अपहाराची अंदाजित रक्कम रु.१३,४१,७१,८६६/- इतकी आहे. यासंदर्भात वखार केंद्र प्रमुखासह इतर १८ जणांविरुध्द इचलकरंची पोलीस ठाण्यात दि.१०.०९.२०२४ रोजी गुन्हा रजिस्टर क्र.०३८२/२०२४ नोंदविण्यात आला असून गुन्ह्याची चौकशी सुरु आहे.

प्रसंगत: प्रस्तुत गैरव्यवहाराची व्याप्ती पाहता, त्यामध्ये अधिक तपासणी करण्याच्या अनुषंगाने वखार महामंडळाच्या स्तरावरील जबाबदार अधिकारी यांचेमार्फत चौकशी करुन जबाबदारी निश्चित करणेबाबत वखार महामंडळास निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोळेश्वर (ता.कराड, जि.सातारा) येथे राष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत

**(१०) * ५०४ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारताला सन १९५२ मध्ये पहिले वैयक्तिक ऑलिंम्पिक पदक मिळवून देणारे कुस्तीवीर स्व.खशाबा जाधव यांच्या गोळेश्वर (ता कराड, जि.सातारा) येथील जन्मगावी त्यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल उभारण्यास शासनाने मंजूरी देवून गोळेश्वर ग्रामपंचायतीने कराड तालुका क्रीडा संकुल समितीकडे एकूण ९५ गुंठे जागा वर्ग केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संकुल उभारणीसाठी शासनाने दिनांक ३० जुलै, २००९ रोजी मान्यता तसेच दि.६ ऑगस्ट, २०१४ रोजी रू ३ कोटी इतकी रक्कम मंजूर करुन त्यातील रूपये १ कोटी रुपये इतकी रक्कम वितरीत केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून शासनाने या संकुलाच्या उभारणीसाठी माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये रु. २५.७५ कोटी निधी मंजूर करुन त्या ठिकाणी विविध सुविधा विकसित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ९५ गुंठे जागेपैकी ५८ गुंठे जागेवर शासनाच्या दुर्लक्षामुळे मोठया प्रमाणात अतिक्रमण झाल्यामुळे तसेच न्यायालयीन दावे दाखल झाल्याने सदरहू संकुलाचे काम निधी उपलब्ध असूनही अद्यापही मार्गी लागू शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर राष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र उभारण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) स्व. खाशाबा जाधव यांच्या कामगिरीच्या स्मरणार्थ गोळेश्वर (ता. कराड, जि. सातारा) येथे स्वतंत्र कुस्ती संकुल उभारण्यास राज्य क्रीडा विकास समितीच्या दिनांक ३० जुलै, २००९ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानंतर दिनांक ३० जानेवारी, २०१४ च्या राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीत या कुस्ती संकुलाच्या रू.१५८.०० लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देऊन त्यानुसार माहे मार्च, २०१४ मध्ये रुपये १.०० कोटी निधी वितरित केला आहे. त्यानंतर दि.११ जून, २०२० रोजीच्या आदेशान्वये यापूर्वीची मान्यता रद्द करून रु. ३००.०० लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. दरम्यान सदर ठिकाणी स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्या नावाने निवासी कुस्ती संकुल उभारणीस व त्यासाठीच्या रुपये २५७५.१५ लक्ष इतक्या अंदाजपत्रकास व निधी मंजूरीस विशेष बाब म्हणून मंत्रिमंडळाच्या दि. २५ ऑगस्ट, २०२४ च्या बैठकीत मान्यता दिली असून त्यानुसार दि.१३ स्पटेंबर, २०२४ अन्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित केले. सदर कुस्ती संकुलाकरिता गोळेश्वर ग्रामपंचायतीकडून ०.९५ आर एवढे क्षेत्र हस्तांतरित केले आहे.

(४), ५) व (६) सदर जागेबाबत स्थानिक रहीवाशांनी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कराड यांच्याकडे अपील केले होते. दिनांक २७/२/२०२५ च्या आदेशान्वये अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कराड यांनी सदर अपील खारीज केले आहे. यानुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील अवैध सावकारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत

**(११) * ४७८२ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: यवतमाळ जिल्हयात मोठया प्रमाणात अवैधरित्या सावकारी होत असून त्यातून शेतकऱ्यांची प्रचंड फसवणूक होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरजू शेतकऱ्यांना कर्ज दिल्यानंतर त्याच्या वसुलीसाठी मोठ्या प्रमाणात तगादा लावणे, मारहाण करणे, वेळीअवेळी शेतकऱ्यांच्या घरी जाणे, महिलांशी गैरवर्तणूक, कर्जवसुलीतून हत्या होणे इत्यादी अनेक गैरप्रकार निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन अवैध सावकारीवर प्रतिबंध घालण्यासह यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) अवैध सावकारीतून कर्ज दिल्यानंतर त्याच्या वसुलीसाठी मोठया प्रमाणात तगादा लावणे, मारहाण करणे, वेळीअवेळी शेतकऱ्यांच्या घरी जाणे, महिलांशी गैरवर्तणूक, कर्जवसुलीतून हत्या होणे इत्यादी गैरप्रकाराबाबत जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ कार्यालयाकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात स्थापन झालेल्या काजू मंडळाच्या माध्यमातून काजूला हमीभाव मिळणेबाबत

**(१२) * २९६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात काजू मंडळाची स्थापना माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काजू मंडळ स्थापन करण्यात आले असले तरी काजूला हमीभाव मिळत नाही, याबाबत शेतकरी व बागायतदारांमध्ये नाराजी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंडळाच्या माध्यमातून उत्पादित काजूचा स्वतंत्र ब्रँड तयार करून त्याला 'जीआय' मानांकन मिळवून देणे, काजूची निर्यात वाढविणे, देशांतर्गत काजू व्यापाराला चालना देणे, काजू प्रक्रिया उद्योग उभारणे, काजू

उद्योगांतून उपपदार्थ तयार करणे, काजूला हमीभाव देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.

काजू फळ पिक योजनेसंदर्भातील कृषि विभागाच्या दि. १६.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनेनुसार, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दि.१६.०५.२०२३ शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची स्थापना केली आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य काजू मंडळ हे काजूचे प्रचारात्मक कार्य (Promotional work),काजू प्रक्रिया आणि मूल्यवर्धन याबाबत कार्य (Processing and Value addition) व मार्केटिंगबाबत कामकाज (Marketing work) या क्षेत्रात काम करणार असून त्यामध्ये काजू ब्रँड तयार करुन त्याची जाहिरात प्रसिध्द करणे, काजू पिकास मिळालेल्या जीआय मानांकनांचा विस्तार करणे, काजू प्रक्रिया उद्योग उभारण्यास चालना देणे, काजू उद्योगांतून उपपदार्थ तयार करणे, देशांतर्गत काजू व्यापाराला चालना देणे, काजू निर्यातीस प्रोत्साहन देणे इत्यादी कामाचा समावेश आहे. काजू मंडळाच्या भागभांडवलाकरीता व काजूफळपिक योजनेअंतर्गत केलेल्या शिफारशीच्या अंमलबजावणीसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात शासनाकडून रु.८८.०० कोटीचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. सदर अर्थसहायातून उपरोक्त नमुद कामे घेण्याचे प्रस्तावित आहे.

हमीभाव देणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. प्रसंगत: राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्यासाठी राज्य शासनाने सन २०२४ च्या काजू फळ पिक हंगामात, काजू उत्पादक शेतकऱ्यांनी विक्री केलेल्या काजू बी साठी प्रति किलो रु.१० प्रमाणे किमान ५० किलो व कमाल २०० किलो या मर्यादेत शासन अनुदान देण्याचा निर्णय दि.०९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर योजना काजू मंडळाच्या मार्फत राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगाखेड (जि.परभणी) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१३) *१४४४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड (जि.परभणी) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक सदस्यांनी करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाजार समितीच्या व्यवस्थापन समितीने सन २०१५-२०१६ मध्ये केलेल्या गैरव्यवहारामुळे समितीचे नुकसान झाल्याचे चौकशी अहवालात नमूद असतानाही या प्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या झालेल्या नुकसानीची रक्कम वसूल करण्यासाठी शासनाने संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

अर्जदार श्री. विष्णु मुरकुटे यांनी माहे ऑक्टोबर २०२४ मध्ये दिलेल्या तक्रार अर्जावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांच्यामार्फत केलेल्या चौकशीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

गंगाखेड बाजार समितीच्या व्यवस्थापन समितीने सन २०१५-१६ मध्ये केलेल्या गैरव्यवहारामुळे समितीचे नुकसान

झाल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच कृषि उत्पन्न बाजार समिती, गंगाखेडचे कुठल्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही त्यामुळे याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मुलींच्या उच्च शिक्षणाकरिता शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क माफ करणेबाबत**

**(१४) * ३२४७ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व मुलींना उच्च शिक्षण घेण्याकरीता ज्यांचे उत्पन्न ८ लाखापर्यंत असेल अशा सर्व मुलींचे शैक्षणिक शुल्क आणि परिक्षा शुल्क संपूर्ण माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शैक्षणिक शुल्क आणि परिक्षा शुल्काचा सर्व खर्च शासन करणार असल्याचा सोईस्कर अर्थ काढत राज्यातील काही महाविद्यालयांनी मुलींना आधी पैसे भरा मग शासनाकडून पैसे आल्यावर परत करु असे सांगून हे शुल्क वसुल केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे तक्रार केली असता अशा महाविद्यालयांमध्ये शासनाचा अधिकारी नेमून त्याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत आश्वासित करुनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) दिनांक ८ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयानुसार, ज्यांचे उत्पन्न ८ लाखापर्यंत असेल अशा पात्र मुलींना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

संबंधित व्यावसायिक शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्यावेळी शैक्षणिक शुल्काची मागणी करु नये याबाबत दिनांक १९.०७.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये या विभागाकडून संबंधितांना सूचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने तंत्र शिक्षण संचालनालय स्तरांवरुन याबाबत सर्व संबंधित संस्थांना निर्देश देण्यात आलेले होते.

तंत्र शिक्षण संचालनालयाने मुलींना शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणेबाबत संस्थांकडून सक्ती करण्यात येत असल्यास, याबाबत मुलींना तक्रार करण्याकरीता मदत दुरध्वनी क्रमांक व मदतकक्ष हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करुन दिले होते. तसेच संचालनालयाच्या परिपत्रकाद्वारे, संस्थांना सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता मुलींना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची नियुक्ती करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार संस्थांनी ४,५०१ मुलींकडून घेतलेली एकूण रु.१३,०८,८६,५७०/- रक्कम मुलींना संबंधित संस्थांनी परत केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा सहकारी बँकेच्या विविध पद भरतीत झालेला गैरव्यवहार**

**(१५) * १९३६ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सहकार आयुक्तालयाने अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा सहकारी बँकेच्या विविध ७०० पदांच्या नोकर भरतीसाठी पॅनलवर घेतलेल्या "वर्क वेल इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड" या कंपनीने पॅनलवर येण्यासाठी सादर केलेली कागदपत्रे बनावट असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहकार आयुक्तालयाने भरती प्रकियेत होणारा गैरव्यवहार थांबविण्यासाठी भरती प्रक्रिया ऑफलाईन ऐवजी ऑनलाईन करण्याचे धोरण अवलंबत माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान सहा कंपन्यांचे पॅनल गठित केले मात्र

उक्त कंपनीची कागदपत्रे बनावट असतानाही चुकीच्या पध्दतीने नियुक्ती केल्याने कंपनीची निवड कोणत्याही टप्प्यावर अडचणीत येवून परीक्षा रद्द होणे, भरण्यात आलेले शुल्क न मिळणे, वेळ वाया जाणे अशा अनेक समस्यांना परीक्षार्थींना सामोरे जावे लागण्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीने अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा सहकारी बँकेच्या भरतीची लेखी परीक्षा पुणे जिल्ह्यातील विविध केंद्रावर ठेवल्याने या भरती विषयी अर्जदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून सदरहू कंपनीविरुध्द स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन उक्त भरती प्रक्रियेमध्ये दोषी असलेल्या सर्व संबंधितांवर कारवाई करणेसह विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) व (२) हे खरे नाही

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतूदीनुसार त्यांच्या व्यवस्थापनामध्ये स्वायत्त आहेत. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९-अ अन्वये दिनांक १५.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सहकारी बँकांमधील पदभरती प्रक्रिया फक्त ऑनलाईन पध्दतीने व त्रयस्थ संस्थेमार्फत करण्याचे निर्देश सर्व सहकारी बँकांना देण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयामध्ये दिनांक २३.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करुन पदभरती प्रक्रिया राबविण्यासाठी सहकार आयुक्तालयाच्या स्तरावर अधिकृत त्रयस्थ संस्थांची तालिका (पॅनल) तयार करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सहकार आयुक्तालयामार्फत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील सरळसेवा सेवकभरती प्रक्रिया निर्विवाद व पारदर्शक होण्याच्या दृष्टीने त्रयस्थ संस्थांचा तालिकेमध्ये समावेश करण्यासाठी दैनिक वृत्तपत्र तसेच सहकार आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर दिनांक १९.०४.२०२३ रोजी जाहिरात देऊन पात्र संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी अपर आयुक्त व विशेष निबंधक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. या समितीमध्ये नाबार्डचे प्रतिनिधी त्याचप्रमाणे राज्य सहकारी बँकेच्या तांत्रिक अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला होता. या छाननीमध्ये शासन निर्णय दिनांक १५.०६.२०१८ व दिनांक २३.०६.२०२२ मधील सर्व निकषांची पूर्तता करीत असलेल्या कंपन्यांचा सहकारी बँकांच्या नोकरभरती तालिकेमध्ये (पॅनल) समावेश करण्यात आला आहे.

वर्कवेल इन्फोटेक प्रा.लि. या कंपनीने सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी दिनांक १४.०१.२०२५ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती व सातारा यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी चौकशी करुन आपला अहवाल अनुक्रमे दिनांक २८.०१.२०२५ व दिनांक २४.०१.२०२५ रोजी सादर केला आहे. सदर अहवालानुसार वर्कवेल इन्फोटेक लि. कंपनीने ऑनलाईन भरतीसाठीच्या तालिकेसाठी सादर केलेली कागदपत्र बनावट नसल्याचे दिसून आले आहे.

(३) होय

मा.श्री. निलेश लंके, लोकसभा सदस्य (अहिल्यानगर दक्षिण) यांनी दिनांक १९.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे तक्रार केली आहे.

(४) अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील रिक्त पदे, बँकेचे कामकाज, बँकेमार्फत निकषाची पुर्तता इत्यादी बाबी विचारात घेऊन बँकेस विविध पदश्रेणीतील रिक्त पदे भरती करण्यास दिनांक २६.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सहकार आयुक्तालयामार्फत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यामधील परीक्षा केंद्रामध्ये संगणक संचाची संख्या कमी असणे, ऑनलाईन युपीएस, जनरेटर बॅकअप व टेक्नीकल सर्पोट उपलब्ध नसणे व या सुविधा असणारे जिल्ह्यातील केंद्र पुढील सहा महिन्यांसाठी उपलब्ध न होणे इत्यादी कारणांमुळे शासन निर्णय दिनांक १५.०६.२०१८ मधील तरतूदीनुसार अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील विविध पदांची परीक्षा नजीकच्या जिल्ह्यामध्ये म्हणजेच पुणे जिल्ह्यातील विविध केंद्रावर घेण्यात आली आहे. तथापि, या संदर्भात उमेदवारांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील "शिवभोजन थाळी व आनंदाचा शिधा" योजना कायमस्वरुपी सुरु राहण्याबाबत**

**(१६) * २८२६ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब आणि गरजू लोकांसाठी "शिवभोजन थाळी" व "आनंदाचा शिधा" या योजना शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवभोजन केंद्राच्या इष्टांकामध्ये वाढ करणे, अनुदानाच्या प्रदानात सुसुत्रता आणणे तसेच सदर शिवभोजन थाळी सायंकाळी देखील सुरु करणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्यात सुरु असलेल्या शिवभोजन केंद्राचे अनुदान वेळेवर वितरित होत नसल्याने अनेक शिवभोजन केंद्रधारकांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अनेक लोकप्रतिनिधींनी, सामाजिक संस्था यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदनाच्या माध्यामातून मागणी करुनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) हे खरे नाही.

(२) शिवभोजन केंद्राच्या इष्टांकामध्ये वाढ करणे ही धोरणात्मक बाब असून याबाबतचा प्रस्ताव सद्य:स्थितीत शासन स्तरावर विचाराधीन नाही.

शिवभोजन केंद्रचालकांची देयके अदा करण्याबाबत सुसूत्रता आणण्यासाठी शासन परिपत्रक, क्र. शिभोथा-१३२३ / प्र.क्र. ८५/ ना.पु.१७, दि.२७.११.२०२४ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

शिवभोजन थाळी वाटपाची वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ इतकी असून शिवभोजन थाळी वाटप सायंकाळी सुरू करणे ही धोरणात्मक बाब असून सद्य:स्थितीत याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही.

(३), (४), (५) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सुरू असलेल्या शिवभोजन केंद्रांचे अनुदान वेळेवर वितरित होण्याच्या अनुषंगाने अनेक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था यांची निवेदने शासनाकडे प्राप्त झाली असनू त्यानुषंगाने शिवभोजन योजनेतील केंद्रचालकांची देयके अदा करण्याबाबत सुसूत्रता आणण्यासाठी शासन परिपत्रक क्र.शिभोथा-१३२३/प्र.क्र.८५/ना.पु.१७, दि.२७.११.२०२४ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत**

**(१७) * १३९७ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने निवडणुकी पूर्वी शेतक-यांना १०० दिवसात शेतक-यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही याप्रकरणी शासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याने शेतकरी संघटनेने शेतक-यांच्या संपूर्ण कर्जमाफीसाठी संपूर्ण राज्यात जनआंदोलन करण्याचा इशारा दिल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने बिहार राज्याला रु. २६००० कोटी आणि आंध्र प्रदेशला रु.१५००० कोटींचा कर्जमाफीसाठी निधी दिला आहे त्याच आधारे राज्यालासुद्धा असा निधी केंद्र शासनाकडून मिळणेबाबत शासनस्तरावरुन

कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) शासनाकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०१९ व महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना या तीन योजना राबविल्या आहेत. कर्जमुक्ती योजने अंतर्गत पात्र असलेल्या शेतकऱ्यांना त्यांनी घेतलेल्या कर्जापोटी अनुक्रमे रु. १.५ लाख व रु. २.०० लाख पर्यंतच्या थकित रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच प्रोत्साहन लाभ योजनेअंतर्गत रु. २५००० व रु. ५०,००० पर्यंतचा लाभ पात्र शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. सदर योजनांतर्गत आतापर्यंत अनुक्रमे रु. १८,७६२ कोटी, रु. २०,४९७.१३ कोटी व रु.५,२१६.७५ कोटी रकमेचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत राज्यातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या संपूर्ण कर्जाची रक्कम माफ करण्यासंदर्भातील निधी मागणीचा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्र शासनास पाठविण्यात आलेला नाही अथवा केंद्र शासनाकडून असा निधी शासनास प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या विविध शाखांच्या परिक्षेमध्ये तसेच पेट आणि एलएलएम प्रवेशपूर्व परिक्षेमध्ये झालेला गैरप्रकार

**(१८) * ४८६३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ ते २०२४-२०२५ या चार वर्षांच्या कालावधीत घेण्यात आलेल्या विविध शाखांच्या परिक्षेदरम्यान विस्कळीत वेळापत्रक, प्रवेश पत्र विलंबाने प्राप्त, प्रश्न पत्रिकेतील चूका, प्रलंबित निकाल व त्यामधील असंख्य त्रुटी तसेच विविध परिक्षांदरम्यान सुमारे २,६५६ गैरप्रकारांची नोंद करण्यात आल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई विद्यापीठातर्फे डोंबिवलीतील एमआयडीसीतील सुरेखा इन्फोटेक या परिक्षा केंद्रावर घेण्यात आलेल्या पेट आणि एलएलएम प्रवेशपूर्व परीक्षांमध्ये नियोजनाचा अभाव, सर्व्हर डाऊन, तांत्रिक अडचणी आणि विविध केंद्रावरील पेट परिक्षा २ ते ३ तास उशिराने सुरु झाल्यामुळे विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०२४ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिक्षा प्रक्रियेतील विस्कळीतपणामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ या कालावधीत कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली होती. या सर्व परीक्षांचे वेळापत्रक विहित कालावधीत विनाविलंब करण्यात आले होते. सन २०२३-२४ पासून सर्व परीक्षा प्रचलित पद्धतीने घेण्यात आल्या होत्या या परीक्षांमध्ये २६५६ कॉपी केसेस नोंद झाल्याची माहिती माहिती अधिकारातून मुंबई विद्यापीठाकडून देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

मुंबई विद्यापीठातर्फे पीएच.डी पुर्व परिक्षा (पेट) दि.१७ नोव्हेंबर, २०२४ रोजी एकूण २१ परिक्षा केंद्रावर घेण्यात आली

होती. त्यापैकी २ परिक्षा केंद्रावर तांत्रिक कारणांमुळे परिक्षा उशिरा सुरु करण्यात आली तथापि, या केंद्रावरील परिक्षार्थींना परिक्षेचा पुर्ण कालावधी देण्यात आला. डोंबिवलीतील सुरेखा इन्फोटेक या परिक्षा केंद्रावरील तांत्रिक बिघाडामुळे पेट परिक्षा त्या दिवशी होऊ शकली नाही सदर परिक्षा दि.२४ नोव्हेंबर, २०२४ रोजी घेण्यात आली आहे.

(३) नाही.

संबंधित परिक्षा केंद्रावरील परिक्षार्थ्यांना परिक्षेचा पुर्ण कालावधी देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आरटीई (RTE) मार्फत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या "ॲक्टिव्हिटीज" फी बाबत**

**(१९) * ५२१८ श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर, मुलुंड, कुर्ला, भांडूप आणि गोवंडी अशा अनेक ठिकाणी खाजगी शाळांकडून आरटी (RTE) मार्फत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना फी माफ असून देखील ॲक्टिव्हिटीज च्या नावाखाली रुपये ५,५०० एवढी फी अनधिकृतपणे आकारली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'ॲक्टिव्हिटीज' फी भरू शकत नसणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्यास मनाई करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे उटंबर (ता. दापोली, जि. रत्नागिरी) येथील वक्फ बोर्डाची देवस्थान इनाम जमीन बळकाविल्याबाबत**

**(२०) * २४६५ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उटंबर (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील वक्फ बोर्डाची देवस्थान इनाम जमीन श्री. मकबूल दिनवारे व त्यांच्या कुटुंबियांनी सुमारे ११.५७५ एकर जागेची बनावट कागदपत्रे तयार करुन स्वत:च्या नावे ७/१२ उतारे तयार करुन शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) अंशत: खरे आहे.

हजरत पीर युसुफ बावा दर्गाह या वक्फ संस्थेच्या परिशिष्ट-१ वर मौजे उटंबर (ता. दापोली, जि. रत्नागिरी) येथील मालमत्ता वक्फ असल्याची नोंद आहे. त्यापैकी काही वक्फ मालमत्तेवर श्री.मकबूल दिनवारे व त्यांच्या कुटुंबियांची नावे असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) यासंदर्भात जिल्हा वक्फ अधिकारी, रत्नागिरी यांना चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी सूचित केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## शालेय पोषण आहार योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

**(२१)** * **१९०० श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) केंद्र शासनाने दिनांक २५ जून, २०२१ व दिनांक १४ जुलै, २०२१ अन्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ (NFSA) अंतर्गत बीड जिल्ह्यासह राज्यातील विद्यार्थी लाभार्थ्यांना अन्न धान्याचे वितरण करण्याचे जाहीर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सन २०२१ या उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत एक वेळ विशेष कल्याणकारी उपायाअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांचे खाते उघडून त्या खात्यात रक्कम वितरित करण्यात आल्याचे सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने बीड जिल्ह्यासाठी ४ कोटींपेक्षा अधिक निधी वितरित करुनही विद्यार्थ्यांच्या खात्यात कोणतीही रक्कम जमा केली नसल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापही विद्यार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा न झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शिक्षणाधिकारी, जिल्हापरिषद बीड, लेखाधिकारी, जि.प.बीड तसेच मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना पत्र/निवेदन दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत सन २०२१ च्या उन्हाळी सुट्टीसाठी केवळ एक वेळ विशेष कल्याणकारी उपाययोजना म्हणून प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सर्व पात्र विद्यार्थ्यांना आहार खर्चाची रक्कम आर्थिक सहाय्य म्हणून थेट लाभ हस्तांतरण स्वरुपात देण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिले होते.

(३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील एकूण ३,३३,९५२ विद्यार्थ्यांना ४७ दिवसांचा लाभ देण्यासाठी एकूण रक्कम रु.८,३९,१०,३३०/- इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले होते. सदर अनुदानापैकी प्रत्यक्षात ७,४८,८८,१९८ इतका निधी खर्च करण्यात आला असून उर्वरित निधी प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे जिल्हा परिषदेमार्फत परत करण्यात आला आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) प्रस्तुत प्रकरणी जिल्हा परिषद बीड स्तरावर त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली होती. सदर समितीच्या अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणी कोणतीही अनियमितता झालेली नाही. तसेच, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या स्तरावरुन उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

-----------------

## कृषी उत्पन्न बाजार समिती (ता.नवापूर, जि. नंदुरबार) अंतर्गत उप बाजार समितीच्या मार्केट यार्डमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२२)** * **२१४० श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती (ता.नवापूर, जि. नंदुरबार) अंतर्गत उप बाजार समिती, विसरवाडी येथील मार्केट यार्डमध्ये सभापतींनी आपल्या पदाचा गैरवापर करुन स्वत:च्या कुटुंबातील सदस्यांच्या नावाने व्यापारी गाळे घेतले असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्यापारी गाळयांमध्ये मटका, जुगार इ. राजरोसपणे सुरु असून उक्त व्यापारी गाळयांमध्ये सभापतींनी दारुचे दुकान सुरु केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सभापतींनी उप बाजार समिती, विसरवाडी (ता.नवापूर) येथे उभारलेले लोखंडी व पत्र्याचे शेड पाडून बाजार समितीचा ठराव न करता व पणन संचालकांची परवानगी न घेता त्याची परस्पर विक्री करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्री.बकाराम गावीत सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, नवापूर यांच्या कुटुंबातील सदस्यांना सन-२००३ मध्ये तीन गाळे वाटप करण्यात आले होते. त्यावेळी ते सभापती पदावर कार्यरत नव्हते. मात्र सन-२००९ मध्ये त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना दोन गाळे वाटप करण्यात आले त्यावेळी ते उपसभापती पदावर कार्यरत होते.
(२) हे अंशत: खरे आहे.

उपबाजार विसरवाडी येथील व्यापारी गाळयांमध्ये मटका, जुगार इ. बाबी चालू असल्याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार यांच्याकडे कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही. मात्र, दोन व्यापारी गाळयांमध्ये बियर शॉपी असून सदर बियर शॉपीचे परवानाधारक व सभापतींचे कुटुंबातील सदस्य भागधारक आहेत. याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याखालील नियम १९६७ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन बियर शॉपी बंद करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे बाजार समितीला निर्देश दिले आहेत.
(३) हे खरे नाही.
लोखंडी व पत्र्याची शेड सद्यस्थितीत बाजार समितीच्या ताब्यात आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सन २०२१ च्या सीईटी परिक्षेच्या नोंदणी व प्रवेश प्रकियेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२३) * ४९७३ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एडसपार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने बनावट कागदपत्रे सादर करुन राज्यात सन २०२१ च्या सीईटी परिक्षेच्या नोंदणी आणि प्रवेश प्रक्रियेमध्ये गैरप्रकार केल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीईटीचे प्रशासन अधिकारी यांच्या मार्गदर्शनासाठी सीएपी (सामान्य प्रवेश प्रक्रिया) या विद्यमान विक्रेत्यांसह सीईटी सेलच्या निविदांसाठी एक कार्टेल तयार करुन निविदांमध्ये फेरफार करून विशिष्ट कंपनीला नियुक्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंपनीमध्ये प्रशिक्षित कर्मचा-यांचा अभाव असून एमबीए सारख्या परिक्षेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असून या कंपनीने अनुभव असल्याची बनावट कागदपत्रे सादर केल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सीईटी विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्कामध्ये अतिरिक्त शुल्क भरावे लागत असून या सर्व प्रकरणी मोठया प्रमाणात अनियमितता होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर प्रकरणांतील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२३-२४ करीता सामाईक प्रवेश परीक्षा (CET) व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) ऑनलाईन पध्दतीने राबविण्याकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून सेवापुरवठादार निश्चित करण्यासाठी विहित प्रक्रिया राबवून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने निविदाकारांनी सादर केलेल्या आवश्यक दस्ताऐवजांची तांत्रिक मुल्यांकन समितीने पडताळणी केली. त्यामध्ये सर्व दस्ताऐवज योग्य असल्याचे खातरजमा करुन निविदामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेल्या न्युनतम दर नमुद केलेल्या संबंधित निविदाकारांची निवड करण्यात आली होती.

(४) हे खरे नाही.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सामाईक प्रवेश परीक्षेकरिता पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. ८००/- व रु. १०००/- आणि मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. ६००/- व रु. ८००/- शुल्क आकारले जात होते. त्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून रु. २०० वाढ करण्यात आली आहे. परीक्षा शुल्क वाढविल्यामुळे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास आजपर्यंत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या महिलांना नियमबाह्यरित्या कर्जवाटप केल्याबाबत**

**(२४) * ४६६२ श्री.सुरेश धस (आष्टी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात बंधन, ग्रामीण कट्टा, समस्ता इसाब फायनान्स, स्वस्तिक, विदर्भ, आरबीएल, संकष्टी इ. मायक्रो फायनान्स कंपन्यांनी आर्थिक साक्षरता नसलेल्या महिलांना अटी शर्तीची कोणतीही पुर्तता न करता एकाच वेळी अनेक कंपन्यांद्वारे कर्ज वाटप केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिले कर्ज परतफेड होण्यापूर्वीच एकाच वेळी पाच ते सहा कंपन्यांनी ५० हजार रुपयापर्यंतचे कर्ज महिलांना वाटप केल्यामुळे कर्जाचा भार रु ५ ते ६ लाखर्पंत गेल्यामुळे सदर महिला आर्थिकदृष्टया अडचणीत आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही महिलांनी एका ठराविक रकमेपर्यंत कर्जाची परतफेड केली परंतु कर्ज व व्याजाची रक्कम वाढतच गेल्याने हे हप्ते भरण्यास महिला असमर्थ असल्याने कर्जाच्या वसुलीसाठी कंपन्यांचे प्रतिनिधी विविध प्रकारे या अशिक्षित महिलांसमवेत गैरवर्तन करणे, दमदाटी करणे, अवेळी त्यांच्या घरी जाणे अशाप्रकारे दडपण आणण्याचे गंभीर प्रकार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कंपन्यांद्वारे वाटप केलेल्या नियमबाह्य कर्जाची चौकशी करुन हे प्रकार थांबविणेबाबत कोकण जनविकास समितीने मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी करुन नियमबाह्य कर्ज वाटप प्रकारांना आळा घालणेबाबत तसेच दोषी कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) व (२) सहकार विभागामार्फत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था, विविध कार्यकारी सहकारी संस्था अशा कर्ज देणाऱ्या संस्थांचे सहकार कायद्यातील तरतुदीनुसार नियमन करण्यात येते. सदर प्रश्नात नमूद केलेल्या बंधन व आरबीएल या खाजगी बँका असून इतर कंपन्या मायक्रो फायनान्स कंपन्या अथवा बिगर बँकींग वित्तीय संस्था (NBFC) असल्याचे दिसून येते. या बँका/कंपन्यांचे सहकार विभागामार्फत नियमन केले जात नाही. त्यामुळे अशा बँका/कंपन्यांनी अटी शर्तींची कोणतीही पुर्तता न करता

आर्थिक साक्षरता नसलेल्या महिलांना एकाच वेळी अनेक कंपन्यांव्दारे कर्ज वाटप केल्याची बाब विभागाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) वरील कंपन्यांच्या प्रतिनिधींनी कर्जाच्या वसुलीसाठी अशिक्षित महिलांसमवेत गैरवर्तन करणे, दमदाटी करणे, अवेळी त्यांच्या घरी जाणे असे प्रकार घडत असल्याचे सहकार विभागाच्या निदर्शनास आलेले नाही.

(४) व (५) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे कार्यालयात कोकण जनविकास समितीने माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास असे निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि असे निवेदन प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेस विनंती करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तुरीला हमीभाव मिळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२५) * ५९२ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सन २०२६ पर्यंत शुन्य टक्के आयात शुल्क आकारल्यामुळे विदेशातील तूर उत्पादकांना सोईचे ठरत असून देशांतर्गत (महाराष्ट्रासह) शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नसून चुकीच्या आयात-निर्यातीच्या निर्णयामुळे राज्यातील तूर उत्पादक शेतकरी अडचणीत आल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्हयात माहे नोव्हेंबर, २०२४ रोजी ९,५०० रुपये प्रति क्विंटल विकणारी तूर ही ६,७०० रुपयांनी व्यापाऱ्यांकडून खरेदी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लातूर जिल्ह्यातील उद्गगीर येथील बाजार समितीत तुरीची आवक वाढली असता अचानक तुरीच्या भावात घसरण झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक समस्येत आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तुरीला हमीभाव मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) केंद्र शासनाच्या दि. २०.०१.२०२५ रोजीच्या नोटीफिकेशन क्र. ५१ अन्वये भारतात तूर आयातीमध्ये आयात शुल्क शून्य करुन आयातीस दि. ३१.०३.२०२६ पर्यंत परवानगी देण्यात आली आहे.

(२) परभणी जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील तूर पिकाची आवक व सरासरी दराची आकडेवारी पहाता परभणी जिल्हातील बाजार समित्यांमध्ये माहे नोव्हेंबर,२०२४ ते माहे जानेवारी, २०२५ या कालावधीत तूरीचे दर गुणवत्तेनुसार सर्वसाधारणपणे रु. ६,५००/- ते रु. १०,५००/- प्रति क्विंटल असल्याचे दिसून येते.

(३) हे खरे नाही.

उदगीर बाजार समितीमध्ये माहे नोव्हेंबर, २०२४ ते माहे जानेवारी, २०२५ या कालावधीत तूरीचे दर गुणवत्तेनुसार सर्वसाधारणपणे रु. ७०००/- ते रु. १३,४०० प्रति क्विंटल असल्याचे दिसून येते. त्यानंतर आवक वाढल्याने दरामध्ये काही प्रमाणात घसरण झाल्याचे दिसून येते.

(४) केंद्र शासनाने हंगाम २०२४-२५ मध्ये तुर या पिकासाठी रु.७५५०/- प्रति क्विंटल प्रमाणे हमीभाव घोषीत केला असून राज्य शासनाने तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची दिनांक २४ जानेवारी, २०२५ पासून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पासून सुरू केली असून दि. १३ फेब्रुवारी, २०२५ पासून खरेदी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी राज्यात एकूण ५९९ खरेदी केंद्र कार्यान्वित करण्यात आली असून २,४७० शेतकऱ्यांकडून ३०,६०७ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे. तसेच हमीभावाने तूर खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोषण आहार योजनेच्या खिचडीतून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याबाबत

**(२६) * ५२४१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघेली (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पोषण आहारांतर्गत देण्यात आलेल्या खिचडीमुळे ५७ विद्यार्थ्यांसह दोन शिक्षकांना विषबाधा झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विषबाधा झालेले विद्यार्थी व शिक्षकांना तातडीने सरकारी दवाखान्यात भरती करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अशा घटनांवर आळा घालणेसह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वाघोली ता. हिंगणघाट शाळेमध्ये दि.०९ डिसेंबर, २०२४ रोजी प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत ८५ विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात आला होता सदर विद्यार्थ्यांपैकी ५५ विद्यार्थ्यांना दि.१० डिसेंबर, २०२४ रोजी त्रास सुरू झाल्यामुळे तपासणी करुन यापैकी ३८ विद्यार्थी व २ शिक्षकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

(३) व (४) सदर प्रकरणी नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांना निलंबित करण्यात आले आहे.

तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून याबाबतच्या उपाययोजना निश्चित करुन त्यानुसार स्थायी आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि बाबुरावजी घोलप महाविद्यालय (जि.सांगली) येथील अर्थशास्त्र प्राध्यापिकेने केलेला गैरव्यवहार

**(२७) * ३६२४ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगलीतील बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्र प्राध्यापिकेला पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेताना अटक करण्यात आल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएचडी संशोधन केंद्रांवर विद्यापीठाचे कोणतेच नियंत्रण नसल्याने अनेक मार्गदर्शक प्राध्यापकांकडून विद्यार्थ्यांची अनेक प्रकारे छळवणूक होत असून मार्गदर्शकांच्या हातात सर्व काही असल्याने अनेक विद्यार्थी तक्रारीसाठी पुढे येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील संशोधन केंद्रात पुरेशा सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पीएचडी मार्गदर्शकांच्या गैरप्रकारांवर आळा घालण्याकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन पोर्टलवर पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली वा तत्सम सक्षम यंत्रणा उभारण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर (पीएच.डी. ट्रॅकींग प्रणालीवर) विद्यार्थ्यांना त्यांना येत असलेल्या अडीअडचणी विषयी तक्रार नोंदविण्यासाठीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(५) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून त्यांच्याकडील सर्व संशोधक केंद्राकडून माहिती संकलित करुन संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखा परिक्षण करण्याची प्रक्रीया सुरु केली आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा ( संशोधन पत्रिका, पुस्तके इ. तसेच विज्ञान व तंत्रज्ञान संशोधन विषयाच्या अनुषंगाने आवश्यक प्रयोग शाळा इ. सोयी सुविधा) उपलब्ध करुन देणे सर्व संशोधक केंद्रांना बंधनकारक केले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ढवळपुरी (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथील विविध सेवा सहकारी संस्थेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२८) * ५०४१ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढवळपुरी (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथील विविध सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी संगनमत करून बनावट रकमेची देयके दाखवून शासकीय रकमेचा मोठ्या प्रमाणात अपहार केल्याचे लेखापरिक्षण अहवालातून दिनांक २४ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून स्वस्त धान्य दुकाने स्वतः चालवत असून, त्या दुकानामध्ये स्वतःच्या मुलाला सेल्समन दाखवून व मापाडी सुद्धा त्यांचाच घरातील सदस्य दाखवून त्यांच्या नावाने अनेक दिवसांपासून वेतन काढण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपहारीत रकमेची वसुली करणेसह संबंधित संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही

ढवळपुरी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. ढवळपुरी (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) या संस्थेच्या सन २०२३-२४ या कालावधीच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये तशी नोंद दिसून येत नाही.

(२) व (३) संस्थेचे सभासद श्री. मनोहर अर्जुन पारखे यांनी दि. २७.०२.२०२४ रोजीच्या तक्रार अर्जान्वये संस्थेमधील अनियमितता व बेकायदेशिर कामकाजाची चौकशी करण्याची विनंती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांना केली होती. सदर अर्जामध्ये स्वस्त धान्य दुकानातील सेल्समन, मापाडी व वॉचमन यांची नियुक्ती व पगाराबाबतच्या चौकशीचा मुद्दा नमूद करण्यात आला आहे. सदर तक्रार अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांनी दि. २६.०३.२०२४ रोजीच्या आदेशान्वये विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांची नियुक्ती केली आहे.

संबंधीत चौकशी अधिकारी यांनी दि. २२.०५.२०२४ रोजी सादर केलेल्या अहवालामध्ये संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानामध्ये चेअरमन यांचे नातेवाईक व मुलगा यांची नियुक्ती ही बाब आक्षेपार्ह असून मापाडी, वॉचमन यांचे वेतन व भत्ते याबाबत अधिक चौकशी होणे आवश्यक असल्याचे अभिप्राय दिले आहेत.

सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सहायक निबंधक, सहकारी संस्था, पारनेर यांनी दि. १४.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सेल्समन, मापाडी व वॉचमन यांना सेवेतून तात्काळ कमी करण्याचे तसेच स्वस्त धान्य दुकानाचे वैधानिक लेखापरीक्षण करणेबाबत निर्देश संस्थेस दिले आहेत. त्यानुसार संबंधितांना दि. १७.०२.२०२५ रोजी सेवेतून कमी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या खर्डी व किन्हवली (ता.शहापूर) केंद्रांतर्गत असणाऱ्या गोदामात बारदानांचा झालेला गैरव्यवहार**

**(२९) * ३२१० डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या खर्डी व किन्हवली (ता.शहापूर) केंद्रांतर्गत असणा-या भातसानगर, बाभळे आणि सावरोली येथील गोदामात ठेवण्यात आलेल्या बारदानांची परस्पर विक्री करुन रु २५ लाख इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याची गंभीर बाब दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाडा (जि.ठाणे) येथील आदिवासी विकास महामंडळाच्या आधारभूत खरेदी केंद्रांमध्ये शासनाचे नियोजन नसल्याने भात साठवणूक योग्यरित्या होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भात खरेदी-विक्री केंद्राच्या गोदामामध्ये हजारो नवीन पोती असतानाही शेतकऱ्यांना जुनी पोती दिली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गोदामामधील हजारो भाताची पोती उंदीर आणि घुशींनी कुरतडली असल्याने सडलेल्या भाताची फोलपटे, कोंडा इत्यादींचा ढिग पडलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच बारदानांचा गैरव्यवहार केलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांनी सनदी लेखापालांमार्फत अंतर्गत लेखापरिक्षण केले असता प्रश्नांकित बाब खरी असल्याचे निदर्शनास आले.

त्यानुसार संबधित गोदामपाल यांच्यावर रू.२५,०६,५०२.४३/- इतक्या रक्कमेचा अपहार केल्याबाबत स्थानिक पोलीस स्टेशन, किन्हवली व शहापूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबधित गोदामपाल यांच्यावर खाते अंतर्गत चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

वाडा ( जि.पालघर ) येथे आदिवासी विकास महामंडळाने आधारभूत खरेदी हंगाम २०२४-२५ करीता ०८ खरेदी केंद्राना मान्यता दिली आहे. सदर केंद्राना संलग्न १,९२,००० क्विंटल क्षमता असलेली गोदामे भाडे तत्वावर घेण्यात आली आहेत. सध्या या ८ खरेदी केंद्रामार्फत ७३,४६२ क्विंटल धान खरेदी झाली असून १,१८,५३७ क्विंटल इतकी साठवणूक क्षमता शिल्लक असल्याने भात साठवणुकीकरिता पुरेशी क्षमता उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाने धान खरेदीसाठी बारदाना वापराबाबत दि.१३.१२.२०१८ अन्वये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार खरेदी केंद्रावर धान खरेदीसाठी बारदाना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) संबधित कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले असून पोलीस स्टेशन, किन्हवली व शहापूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबधित गोदामपाल यांच्यावर खाते अंतर्गत चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागात झालेला गैरव्यवहार**

**(३०) * १४६४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस**

**कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागातील माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती ललिता दहितुले व आर.पी.मंगला हायस्कुल मधील श्रीमती रुपाली थोरात, लिपिक यांच्यामार्फत लाच घेऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विविध कामे करुन त्या कामांमध्ये मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने वरिष्ठांची सखोल चौकशी करण्यासाठी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अहवालात केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी (माध्य) यांच्या कार्यालयाची तपासणी करण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी दि.१९.०६.२०२४ च्या आदेशान्वये संचालक, बालभवन, चर्नी रोड, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केली होती.

(३) सदर समितीने दि.२३.०६.२०२४ च्या पत्रान्वये आपला अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांना सादर केला आहे.

(४) प्राप्त अहवालातील विविध बाबींबाबत सखोल तपासणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषद शिक्षण प्राथमिक विभागाच्यावतीने प्राथमिक शाळांना पुरविण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या सोयी-सुविधांबाबत

**(३१) * ५००९ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद शिक्षण प्राथमिक विभागाच्या वतीने प्राथमिक शाळांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ड्युअल डेस्क पुरवठा करण्यासाठी रु.१,४९,९८,८००.०० तसेच प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये ई लर्निंग बसवणे, विज्ञान प्रयोग शाळा स्थापन करणे व ई-टिचिंग डिव्हाईस पुरवठा करण्यासाठी अनुक्रमे रु.१,७८,२५,०००.००, रु.९९,६०,०००.०० व रु.३,४०,६५०००.०० इतक्या रकमेची कामे मंजूर होऊन कार्यारंभ आदेश देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे निकृष्ट दर्जाची झाली असून यात गुणवत्तेसंदर्भातील शासनाच्या कोणत्याही परिपत्रकाचा अवलंब करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त नमूद कामाच्या दोन विविध कार्यारंभ आदेशासाठी एकच जावक क्रमांक वापरण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, संबंधित सर्व पुरवठ्याच्या बाबतीत गुणवत्ता नियंत्रण विभागाच्या वतीने अथवा ज्या लॅबोरेटरीच्या वतीने अहवाल सादर केलेले आहेत त्या अहवालाच्या बाबतीत देखील विविध तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याची चौकशी करण्याची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) याबाबत, आयुक्त (शिक्षण) यांना चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या केंद्रावर धान व भरडधान्यात झालेला गैरव्यवहार**

**(३२) * १४६६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पणन हंगाम सन २०२२-२३ मध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रास धान व भरडधान्य खरेदी करिता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादीत, नाशिक यास अभिकर्ता म्हणून शासनाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास नियुक्ती केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, साफडबाव (ता.शहापूर) व मौ.सुगवे (ता.कर्जत) तसेच वेळोली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे सुरु करण्यात आलेल्या सदरच्या केंद्रांवर धान खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने सदर प्रकरणी प्रादेशिक व्यवस्थापक, उपप्रादेशिक व्यवस्थापक, विपणन निरिक्षक व गोदामपाल यांच्यावर व संबंधितांवर अद्याप कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, यांच्याकडून दोषी आढळलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करुन व सदर अधिकारी/कर्मचारी यांसह धान खरेदी संस्थेशी संबंधित व्यक्तींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.